# पंडित जवाहरलाल नेहरू च्या कृषी धोरणाचा अभ्यास

**प्रा. बळवंतराव कुंडलिक जाधव, सहा. प्राध्यापक( राज्यशास्त्र ) एन. एस. सोटी लॉ कॉलेज सांगली.**

---

**प्रस्तावना -15 ऑगस्ट 1947 रोजी भारत स्वतंत्र झाला. ब्रिटीशांची असणारी 150 वर्षाची गुलामी संपली व भारत जगाच्या नकाशावर एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून अस्तित्वात आले. भारताचे स्वतंत्र होण्याचे स्वप्न पूर्ण झाले पण या स्वातंत्र्याबरोबरच भारताला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. भारतात 1857 पासून ते 15 ऑगस्ट 1947 पर्यंत संपूर्ण भारत स्वातंत्र्य लढा मध्ये व्यस्त होता, त्यामुळे भारताची अर्थव्यवस्था विस्कळीत झाली होती किंबहुना भारताला ब्रिटिशांनी मोठ्या प्रमाणात लुटले होते, ब्रिटिश स्वतः श्रीमंत देश झाला होता.**

**ब्रिटिशांनी भारताला स्वातंत्र्य दिले पण त्याबरोबर भारताची फाळणी ही केली व हिंदुस्थानचे दोन देश अस्तित्वात आले एक भारत तर दुसरा पाकिस्तान आणि या देशाच्या फाळणीमुळे भारतामध्ये खूप मोठ्या प्रमाणात समस्या निर्माण झाल्या.फाळणीमुळे भारतात स्थलांतर यांचा प्रश्न खूप मोठ्या प्रमाणात निर्माण झाला पाकिस्तान मधून मोठ्या प्रमाणात स्थलांतर भारतात झाले होते त्यामुळे, निर्वासितांचे पुनर्वसन करणे हे खूप मोठे काम होते. तसेच भारतात अन्नधान्याची भीषण टंचाई होती पारंपरिक पद्धतीने शेती केली जात होती त्यामुळे भारतातील नागरिकांची भूक ही भारतातील शेतीवर भागवणे खूप अवघड काम होते.शेतीमध्ये वापरली जाणारी बी-बियाणे, अवजारे,खते आणि सिंचनाची साधने ही जुन्या पद्धतीची होती त्यामुळे शेती मधून उत्पादन खूप कमी प्रमाणात होत होते.1950 मध्ये भारतातील शेतीमधून अन्नधान्याचे उत्पादन 50.8 मिलियन टन इतके कमी होते. भारत स्वतंत्र झाला तेव्हा भारताची आर्थिक घडी विस्कळीत झाली होती तसेच महागाई मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत होती.तर GDP वाढीचा दर 2.3% इतका कमी होता.**

**1947 मध्ये भारत सर्वच क्षेत्रामध्ये पिछाडीवर होता उदाहरणार्थ शेती, अन्नधान्य,सिंचन, प्राथमिक शाळा व उच्च शिक्षा, साक्षरता दर, सडक, लाईट, निर्यात, संरक्षण इंडस्ट्रीज, हेवी इंडस्ट्रीज, परकीय व्यापार, एक्सपोर्ट .अशा सर्व क्षेत्रांमध्ये पीछाडीवर असणारा भारत देश 15 ऑगस्ट 1947 रोजी स्वतंत्र झाला व सत्तेवर येणाऱ्या सरकारकडून देशातील जनतेने खूप मोठ्या प्रमाणात आशा ठेवल्या या सर्व अपेक्षा पूर्ण करण्याचे काम सरकारचे होते आणि 15 ऑगस्ट 1947 रोजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी शपथ घेतली आणि झपाटून काम करण्यास सुरुवात केली. इतर सर्व क्षेत्रा पेक्षा जास्त प्राधान्य पंडित जवाहरलाल नेहरूंनी शेती या क्षेत्राला दिले कारण तत्कालीन परिस्थिती मध्ये जोपर्यंत भारत देश अन्नधान्य यामध्ये स्वयंपूर्ण होऊ शकत नाही तोपर्यंत आपला देश प्रगती करू शकत नाही किंवा नागरिकांची भूक भागवू शकत नाही, त्यामुळे पंडित जवारलाल नेहरू यांचे स्वप्न होते की आपल्या देशाच्या नागरिकांची भूक परकीय देशाकडून अन्नधान्य आयात करून भागवण्याची वेळ आपल्या देशावर येऊ नये त्यासाठी शेती क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा करणे हे त्यांचं प्राथमिक कार्य होत.**

**संशोधनाची उद्दिष्टे खालील प्रमाणे-**

(1) **स्वातंत्र्यपूर्व कालीन कृषी संदर्भातील समस्यांचा अभ्यास करणे.**

(2) **पहिल्या पंचवार्षिक योजनेचा(1951-56) अभ्यास करणे.**

(3) **शेतीच्या पाण्याच्या संदर्भातील नेहरूंनी केलेल्या सुधारणांचा अभ्यास करणे.**

**(1) स्वातंत्र्यपूर्व कालीन कृषी संदर्भातील समस्या-**

15 ऑगस्ट 1947 रोजी भारत गुलामगिरीतून मुक्त होऊन स्वतंत्र झाला पण त्यापूर्वी शेती ची परिस्थिती भयानक बिकट होती. त्यावेळी भारतात जमीनदारी पद्धती होती. जमीनदार शेतकऱ्यांना जमीन कसण्यासाठी देत होते व जमीनदार शेतकऱ्याकडून प्रति वर्ष मोठ्या प्रमाणात खंडणी वसूल करत होते तर ब्रिटिश सरकार शेतकऱ्यांच्या कडून कर वसूल करत होते. त्यामुळे एक तर उत्पन्न कमी होते आणि त्या उत्पन्नातून जमीनदार व ब्रिटीशांचा कर दिल्यामुळे शेतकऱ्यांच्या पदरात खूप कमी उत्पादन राहत होते. त्यामुळे शेतकरी खूप गरिबीत आपले जीवन जगत होता. शेतकऱ्याला स्वतःसाठी लागणारी प्रतिवर्ष अन्नधान्य पण त्याच्याकडे शिल्लक राहत नव्हतं.

स्वातंत्र्यपूर्व शेतीला सिंचनाच्या सुविधा नव्हत्या कारण भारतामध्ये धरणे, तलाव, तळी, विहिरी, पाईप लाईन, यांचे खूप कमी प्रमाणात म्हणजे अगदी नगण्यच बांधकामे झाली होती. त्यामुळे भारतातील शेती ही फक्त पावसाच्या पाण्यावर केली जात होती त्यामुळे शेतीतून दोन पिके घेतली जात असत एक खरीप तर दुसरे रब्बी .त्यामुळे शेतीतून अन्नधान्याचे उत्पादन खूप कमी प्रमाणात होत होते. विहिरीवर इलेक्ट्रिक पाण्याची मोटर नव्हती. बैलांच्या मोटेने शेतीला पाणी पाजले जात होते.बागायती शेतीचे प्रमाण ही खूप अल्प होते. शेतीच्या उत्पादनाला विकसित बाजारपेठ नव्हती त्यामुळे शेतीतून मिळणाऱ्या उत्पादनातून शेतकरी पैसे कमवू शकत नव्हता आणि शेतकऱ्याची फसवणूक केली जात होती.वरील सर्व कारणांमुळे शेतकरी हा अविकसित व गरीबच राहिला. शेतकरी गरीब राहिल्यामुळे संपूर्ण भारत देशच गरीब राहिला.1947 चा कालावधी पाहिला तर भारतातील एकूण लोकसंख्येच्या 75 टक्के लोकसंख्या ही खेड्यात राहत होती व त्यांचा उदरनिर्वाह हा संपूर्ण शेतीवर अवलंबून होता. भारत देश हा शेती प्रधान देश आहे पण या ठिकाणी शेतकरीच उपेक्षित होता.

(II) पहिल्या पंचवार्षिक योजनेचा(1951-56) अभ्यास या योजनेचा कार्यकाल 01 एप्रिल 1951 ते 31 मार्च 1956 असा आहे. या पंचवार्षिक योजनेची उद्दिष्टे

(1) दुसऱ्या महायुद्धामुळे तसेच देशाच्या फाळणीमुळे ढासळलेली अर्थव्यवस्था पुन्हा नव्याने उभी करणे (2) भारताच्या शेती विकासाचा पाया घालने (3) आर्थिक विषमता कमी करून सर्वांना समान संधी मिळेल अशी व्यवस्था करणे (4) राष्ट्रीय उत्पन्नात 11 टक्क्यांनी वाढ करणे (5) रोजगाराच्या संधी मध्ये वाढ करणे व लोकांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारणे.

पहिल्या पंचवार्षिक योजनेवर खर्च 1,960 कोटी रुपये झाला. त्यापैकी शेती व सामुहिक विकास तसेच कालवे पाटबंधारे आणि ऊर्जा या क्षेत्रावर 44 % रक्कम खर्च केली व शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा केल्या. हे पंडित जवाहलाल नेहरू सरकारचे घवघवीत यश आहे. 44 % रक्कम या वरुन लक्षात येते की नेहरूंनी किती मोठ्या प्रमाणात शेती क्षेत्रावर लक्ष केंद्रित केले आहे व त्यांना शेतीमध्ये किती मोठ्या प्रमाणात विकास सुधारणा अपेक्षित होत्या. (1) शेती व सामुहिक विकास यावर 15% रक्कम खर्च केली.(2) कालवे, पाटबंधारे व ऊर्जा यावर 29 % रक्कम खर्च केली. पहिली पंचवार्षिक योजना हे कृषिप्रधान होती. देशाची अन्नधान्य विषयक गरज लक्षात घेता कृषी ला अग्रक्रम देणे अनिवार्य होते व देशातील अन्नधान्याचे उत्पादन वाढविणे ही त्या काळाची गरज होती. कारण पंडित जवाहरलाल नेहरूंनी 1943 चा बंगालमधील दुष्काळ पाहिला होता त्यामध्ये जवळजवळ 20 लाख लोकांचा दुष्काळाने बळी घेतला होता.

शेतीला पाणीपुरवठा व्हावा या हेतूने पंडित जवाहलाल नेहरू नी व काँग्रेस सरकारने पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये ( 1951-56) काही प्रकल्प हाती घेतले व ते पूर्ण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात

प्रयत्न करण्यात आले व पहिल्या पंचवार्षिक योजनेतील मोठ्या प्रमाणात आर्थिक हिस्सा हा धरण बांधणे व शेतीला जलसिंचनाच्या योजना पूर्ण करण्यासाठी वापरला गेला उदाहरणार्थ दामोदर खोरे विकास योजना, भाकरा नांगल प्रकल्प, कोसी प्रकल्प आणि हिराकुड योजना .

पूर्वी शेतकरी शेतीसाठी सेंद्रिय खत वापरत होते त्यामुळे शेतीचे उत्पादन कमी होत होते शेतीचे उत्पन्न वाढवायचे असेल तर पंडित जवाहलाल नेहरू च्या लक्षात आले होते की शेतकऱ्यांनी रासायनिक खते वापरली पाहिजेत पण रासायनिक खतांचा देशांमध्ये तो तुटवडाच नव्हता तर रासायनिक खतांचे उत्पादन घेतले जात नव्हते त्यामुळे पंडित जवाहरलाल नेहरूंनी शेंद्री येथे खत कारखाना सुरू केला. व खत कारखान्याचे उत्पादन करण्यास सुरुवात केली त्यामुळे शेती उत्पादनात वाढ झालेली दिसून येते.

पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये नेहरूंनी शेतीवर लक्ष केंद्रित केल्यामुळे अन्नधान्याचे उत्पादन 52.2 दशलक्ष टनांवरून ते 65.8 दशलक्ष टनांपर्यंत वाढले, तेलबिया चे उत्पादन 5.1 दशलक्ष टनांवरून 5.6 दशलक्ष टनांपर्यंत पर्यंत वाढले, ऊस 5.7 दशलक्ष टनांवरून 6.0 दशलक्ष टनांपर्यंत वाढले,पाऊस 2.9 दशलक्ष टनांवरून 4.0 दशलक्ष टनांपर्यंत वाढला, शेती उत्पादनातील वाढ हे नेहरूंचे घवघवीत यश आहे. अन्नधान्याचे उत्पादन मूळ उद्दिष्टापेक्षा 33 टन अधिक झाले व कृषी उत्पादन 20 टक्क्याने वाढले.मोठ्या प्रमाणावर जलसिंचन व ऊर्जेच्या पायाभूत सोयींचा सुरुवात झाली. तसेच शेती पूरक उद्योग उदाहरणार्थ कापड उद्योग, साखर उद्योग, जूट उद्योग, खाण्याचे तेल उद्योग या व्यवसायाची वाढ होऊ लागली व देशाच्या तसेच शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होऊ लागली.

(3) शेतीच्या पाण्याच्या संदर्भातील नेहरूंनी केलेल्या सुधारणांचा अभ्यास करणे.

पंडित जवाहरलाल नेहरूंची जडणघडण विशेषता बालपण उच्चशिक्षित व श्रीमंत परिवारामध्ये गेले तसेच त्यांचे प्राथमिक शिक्षण ही व्यवस्थित झाले व उच्च शिक्षण हे नामांकित परदेशातील विश्वविद्यालयात झाले. त्यामुळे पंडित जवाहरलाल नेहरू के जगभर फिरलेले व उच्चशिक्षित, दूरदृष्टी कोण असणारे, शास्त्रशुद्ध पद्धतीने विचार करणारे , संयमी ,असे व्यक्तिमत्त्व होते. तसेच जगभर फिरल्यामुळे इतर देशांच्या मध्ये असणारी शेती मधील भरभराटी ,शेतीमध्ये असणारे आधुनिकता, शेतीमध्ये असणारी सिंचनाच्या सुविधा या जवाहरलाल नेहरूंनी पाहिल्या होत्या या सुविधा भारतीय शेतकऱ्याला सुद्धा मिळाल्या पाहिजेत असे त्यांना वाटत होते व ते असे स्वप्नही बघत होते ,पण त्यांच्या डोळ्यासमोर असणारे भारताचे दारिद्र्य, शिक्षणामध्ये कमी ,जीवन स्तर कमी दर्जाचा,शेतीमध्ये तंत्रज्ञान नाही, शेतीला सिंचनाच्या सुविधा नाहीत हे चित्रही डोळ्यासमोर येत होते . म्हणून भारताचे पहिले पंतप्रधान या पदाचा पदभार स्वीकारताच नेहरू म्हणाले की, “भारतामध्ये इतर क्षेत्रे सुधारणेसाठी वाट बघू शकतात पण शेती क्षेत्र सुधारण्यासाठी वाट बघू शकत नाही त्यामुळे शेतीत सुधारणा या पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून सुरू झाल्या पाहिजेत” व त्या सुधारणा पंडित जवाहलाल नेहरू नी पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून सुरू केल्या त्यामध्ये त्यांनी प्राधान्य शेतीला जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी भारतामध्ये धरणे बांधण्यास सुरुवात केली.

दामोदर खोरे विकास योजना, भाकरा नांगल धरण, कोसी प्रकल्प, हिराकुड धरण इत्यादी धरणे ही अमेरिकेतील टेनेसी खोरे प्रकल्पाच्या आराखड्यावर आधारित होते ,तसेच ते बहुउद्देशीय प्रकल्प आहेत. म्हणून भारतातील वरील सर्व धरणे ही बहुउद्देशीय प्रकल्प आहेत. त्यामुळे वरील धरणातून शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रयत्न केलेला आहे उदाहरणार्थ धरणामुळे पूर येणारा थांबला. तसेच शेतीला जलसिंचनासाठी पाणी मिळाले, धरणातून वीज निर्मिती होऊ लागली. धरणातून मासेमारी होऊ लागली,

धरणांमुळे पर्यटनाला चालना मिळाली. धरणांमुळे पिण्याच्या पाण्याच्या योजना सुरू झाल्या व ग्रामीण भागामध्ये खेड्यापर्यंत पाईप लाईन द्वारे पिण्याचे पाणी उपलब्ध झाले असे अनेक फायदे हे धरणामुळे झालेले आहेत.

भाकरा धरण हे सतलज नदीवर बिलासपुर या ठिकाणी हिमाचल प्रदेशात बांधले आहे. हे धरण 1963 ला बांधून पूर्ण झाले. तसेच यावर 245 कोटी बांधकामासाठी खर्च केले. भाकरा धरण यामुळे उत्तर भारतातील बहुतांश राज्यांना शेतीसाठी मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध झाले. त्यामुळे शेतीचे उत्पादन वाढू लागले व शेतीमध्ये एका वर्षात ज्या ठिकाणी एक पीक घेतले जात होते त्या ठिकाणी प्रत्येक वर्षी तीन-तीन पिके घेतली जाऊ लागली. भाकरा धरणामुळे शेतीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले व भारत शेती उत्पादनामध्ये आत्मनिर्भर होऊ लागला.

भाकरा धरण बरोबरच पंजाब मध्ये नांगल धरण हे एक बांधले गेले. भाकरा धरण व नांगल धरण ही वेगळी दोन धरणे आहेत परंतु या दोन्ही धरणांना भाकरा नांगल धरण असे एकत्र संबोधले जाते नांगल धरणामुळे पंजाबला खूप मोठ्या प्रमाणात शेतीसाठी पाणी उपलब्ध होऊ लागले व जिरायती शेती ही बागायती शेतीमध्ये परिवर्तित होऊ लागली आणि अन्नधान्याचे उत्पादन खूप मोठ्या प्रमाणात वाढले. भाकरा नांगल धरणामुळे दुसरा एक महत्त्वाचा फायदा झाला तो की सतलज नदीवर खूप मोठ्या प्रमाणात या धरण्यापूर्वी पूर येत होता त्यामुळे शेतकऱ्यांचे खूप मोठ्या प्रमाणात पुरामुळे नुकसान होत होते ते नुकसान धरण बांधल्यामुळे कमी झाले.

भाकरा नांगल धरणावर भाकरा कॅनल हे बांधले गेले या कॅनल मुळे शेतीला जलसिंचनाची सोय उपलब्ध होऊ लागली तसेच 10 मिलियन एकर इतक्या मोठ्या प्रमाणात क्षेत्र पाण्याखाली आले सर्वसाधारण 40,000 वर्ग किलोमीटर इतकी शेती पंजाब, हरियाणा व राजस्थान राज्यांमध्ये ही पाण्याखाली आली व बागायती पिके घेऊ लागले.भाकरा धरणावर वीज निर्मिती ही केंद्रे उभारण्यात आली या वीज निर्मिती केंद्रातून मोठ्या प्रमाणात वीज निर्मिती करण्यात येऊ लागली उदा. 1325 मेगावॉट इतकी वीज निर्मिती होऊ लागली व उत्तर भारतातील राज्यात शेतकऱ्यांना देण्यात येऊ लागली त्यामुळे पूर्वी शेतकरी जलसिंचनासाठी पारंपारिक पद्धतीने जलसिंचन करत होता, तो शेतकरी आता इलेक्ट्रॉनिक मोटर द्वारे शेतीला पाणी देऊ लागला त्यामुळे शेतीच्या उत्पादन खर्चामध्ये कमी खर्च होऊ लागला व उत्पादन वाढू लागले. या वीजनिर्मिती प्रकल्पामुळे शेतकऱ्यांमध्ये आधुनिक वैचारिकता निर्माण झाली .शेतकऱ्यांनी जुन्या पद्धतीने शेती करण्याची वैचारिकता सोडून दिली व आधुनिक पद्धतीची कास धरली त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ झाली शेतकऱ्यांना समजू लागली की शेतीमध्ये तंत्रज्ञान येऊ शकते, शेतीमध्ये बदल होऊ शकतो आणि हा जर बदल केला तर शेतीमध्ये उत्पादन वाढू शकते. वीज निर्मिती मुळे सर्वात मोठे हे शेतकऱ्यांची वैचारिकता बदलणे व त्यांना आधुनिकता देणे हे नेहरूंचे मोठे कार्य आहे. पंडित जवाहरलाल नेहरूंनी हा वीज निर्मिती प्रकल्प इतर देशांच्या मदतीने उभारला गेला .भारतामध्ये अजूनही शेतीमध्ये शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग शंभर टक्के झाला नाही उदाहरणार्थ सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुका द्राक्ष उत्पादनामध्ये जगभर प्रसिद्ध आहे पण तासगाव तालुक्यातील 100% शेतकऱ्यांनी द्राक्षाचे उत्पादन घेण्यासाठी जमीन व पाण्याचे परीक्षण करावे लागते ते केलेले दिसून येत नाही. शेतीला पाणीपुरवठा व्हावा या हेतूने पंडित जवाहलाल नेहरू नी काही प्रकल्प हाती घेतले दामोदर खोरे विकास योजना, भाकरा नांगल प्रकल्प, कोसी प्रकल्प आणि हिराकुड योजना भाकरा धरण झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणीसाठा झाला या पाणीसाठ्यात पंडित जवाहरलाल नेहरूंनी माशाचे उत्पादन

घेण्यासाठी स्थानिक लोकांना प्रेरणा दिली. त्यामुळे अन्नधान्याची गरज ही माशांच्या द्वारे भागवली जाऊ लागली तसेच स्थानिक लोकांना रोजगारही मिळू लागला व आर्थिक फायदेही होऊ लागले.

भाकरा नांगल धरणामुळे पंजाब, हरियाणा ,राजस्थान, हिमाचल प्रदेश, दिल्ली आणि चंदिगड मधील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात फायदा झाला त्यांची आर्थिक प्रगती झाली शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती म्हणजे देशाची आर्थिक प्रगती झाली व जीडीपीमध्ये वाढ झाली. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या शेतीच्या धोरणामुळे व शेतीसाठी दिलेल्या प्राधान्य मुळे देशाच्या आर्थिक विकासाला गती मिळाली त्याच बरोबर भारत देश अन्नधान्याच्या उत्पादनामध्ये आत्मनिर्भर झाला.

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रयत्नामुळे महानंदी नदीवर हिराकुड धरण संबलपुर या ठिकाणी ओडिशात बांधले गेले. या धरणामुळे ओडिसा राज्यातील शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी उपलब्ध झाले व शेती बारमाही शेती होऊ लागली, शेतीचे उत्पादन वाढले तसेच शेतकऱ्यांचे उत्पादन वाढले व शेतकऱ्यांचा आर्थिक विकास ही झाला.

कोसी धरण हे नेपाळमधील सप्तकोशि नदीवर बांधले आहे.हे धरण बांधण्याचा प्रमुख उद्देश हा होता की दक्षिण नेपाळ व उत्तर बिहार मध्ये या सप्तकोशी नदीमुळे खूप मोठ्या प्रमाणात पूर येत होता.या महापुरामुळे दक्षिण नेपाळ व उत्तर बिहार मधील शेतकरी खूप मोठ्या प्रमाणात त्रस्त झाले होते त्यामुळे या नदीवर धरण बांधून बहु उद्देश साजरा करणे हे पंडित जवाहरलाल नेहरूंचे धोरण होते. या धरणामुळे नागरिकांची पुरापासून सुटका तर झालीच पण त्याच प्रमाणे शेतीला बारमाही पाणी उपलब्ध होऊ लागले शेतीच्या व शेतकऱ्यांच्या उत्पादनांमध्ये वाढ होऊ लागली व देशाच्या आर्थिक विकासाला या धरणामुळे मदत झाली. हे धरण बांधण्यासाठी एस. पी. प्रसाद या अभियंत्याने खूप मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. या धरणामुळे पंडित जवाहरलाल नेहरू चा असणारा शेतीच्या प्रति आधुनिक दूरदृष्टीकोन दिसून येतो.

दामोदर खोरे विकास योजना पश्चिम बंगाल व झारखंड राज्यांना उपयुक्त असे दामोदर खोरे विकास योजन तयार केली आहे. दामोदर विकास योजना ही फक्त एका नदीवर बांधण्यात आलेले नाही तर वेगवेगळ्या ठिकाणी चार धरणे आहेत या धरणामुळे पश्चिम बंगाल मध्ये असणारा पुराचा धोका खूप मोठ्या प्रमाणात कमी झालेला आहे. दामोदर खोरे विकास योजनेमुळे भारतातील 569,000 हेक्टर जमीन (5690 वर्ग किलोमीटर जमीन ) बागायती झाली आहे. या योजनेमध्ये सन 2021 मध्ये 6600 कामगार काम करत आहेत. इतक्या मोठ्या योजनेची पायाभरणी हे पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केली आहे . या योजनेमुळे पश्चिम बंगाल व झारखंड राज्यातील शेतकऱ्यांना शेतीसाठी व पिण्यासाठी पाणी उपलब्ध होऊ लागले आहे. या प्रकल्पातून 2494 किलोमीटर इतक्या लांब-लांबीचे याचे लहान- मोठे पाण्याचे पाठ आहेत या पाण्याच्या पाटातून शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत जलसिंचनाचे पाणी पुरविले जात आहे.तसेच मासेमारी च्या माध्यमातून शेतकऱ्यांना तसेच स्थानिक कामगारांना रोजगार मिळू लागला व अन्नधान्यावर असणारा तान हा कमी झाला,या प्रकल्पातून 7557.2 मेगावॅट वीज निर्मिती केली जाते, तसेच या योजनेमध्ये 6600 कामगारांना काम मिळाले त्यामुळे काही प्रमाणात बेरोजगारी ही कमी झालेली दिसून येते.

निष्कर्ष- 15 ऑगस्ट 1947 रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले पण या स्वातंत्र्याबरोबर भारताला अनेक समस्यांनाही समोर जावे लागत होते. एका बाजूला भारत स्वतंत्र झाला म्हणून भारतीय आनंदोत्सव साजरा करत होते. पण पंडित जवाहरलाल नेहरू यांना पुरेपुर जाणीव होती की याबरोबरच अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, अशा अनेक समस्या होत्या त्यामध्ये शेती ही एक समस्या होती आणि शेती या समस्यावर पंडित जवाहरलाल नेहरूंनी संपूर्ण लक्ष केंद्र केले किंबहुना प्राधान्य दिले आणि पहिल्या

**पंचवार्षिक योजनेमध्ये मध्येच शेतीवर मोठ्या प्रमाणात खर्च केला शेतीमध्ये धरणे , ऊर्जा, जलसिंचन , मासेमारी, अन्नधान्य उत्पादनात वाढ ,शेतीमध्ये आधुनिकता, तसेच आयआयटी खरगपूर येथे एग्रीकल्चर इंजीनियरिंग.अशा अनेक विषयावर पंडित जवाहलाल नेहरू यांनी लक्ष केंद्रित केले व बागायती शेती वाढविली अन्नधान्य उत्पादनात वाढ केली शेतीला लाईट देऊन शेतीमध्ये प्रगती होऊ शकते ,आधुनिक येऊ शकते हे नेहरूंनी हे दाखवून दिले. लाईट मुळे शेतकऱ्यांची मानसिकता बदलली. बदलामुळे उत्पन्नात वाढ झाली शेतकऱ्यांचा आर्थिक फायदा झाला व भारतातील नागरिकांची भूक भारतातील अन्नधान्य वरच भागवली जाऊ लागली. 2019-20 हया वर्षाचे अन्नधान्याचे भारताचे उत्पादन 291.95 मिलियन टन इतके झाले आहे हे नेहरूंचे मोठे कार्य आहे.**

**याबरोबरच कृषी मूल्य आयोग स्थापन केला, जमीन सुधारणा कायदे आणले , शेतकऱ्यांच्या पुत्रांना राजकारणामध्ये मोठी संधी दिली . महाराष्ट्र मध्ये तर शेतकरी पुत्र यशवंतराव चव्हाणांना मुख्यमंत्रीच बनवले. कारण पंडित जवाहरलाल नेहरूंना शेतीमध्ये सुधारणा करून एक सशक्त बलशाही, आर्थिक सामर्थ्यवान, सैन्यात शक्तीने बलशाही भारत निर्माण करायचा होता आणि तो त्यांनी करून दाखविला.**

**संदर्भ-**

**( 1) डॉ. प्रभाकर देशमुख, आर्थिक धोरण आणि नियोजन, पिंपळापुरे अंड कं. पब्लिशर्स ,जुलै 1989 नागपूर.**

**(2) डॉ. सौ निर्मल भालेराव ,भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन पुणे, मे 2011.**

**(3) डॉ. विश्वास मेहेंदळे, आपले पंतप्रधान, अनुबंध प्रकाशन पुणे, सप्टेंबर 2008.**

(4) **डॉ. डी. डी. पाटील, प्रा. ए. आर. पाटील,आधुनिक भारताचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरू, अथर्व पब्लिकेशन्स एप्रिल 2011.**

(5) **साने गुरुजी, ना. वि. करंदीकर, पं. जवाहरलाल नेहरू भारताचा शोध, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे,1976 .**

(6) **डॉक्टर नीला पांढरे, पंडित जवाहरलाल नेहरू, उन्मेष प्रकाशन, जुलै 2012.**

(7) **“भारत के शिल्पी, भारत के जवाहर”- राज्यसभा टेलिव्हिजन वरील कार्यक्रम**

(8) **“ नेहरू की याद” - राज्यसभा टेलिव्हिजन वरील कार्यक्रम.**

(9) **इंटरनेटवरील विविध लेखन व विकिपीडिया.**